# प्रकरण पाचवे

# लक्ष्मण गायकवाड यांच्या उचल्यामधील लेखनाची प्रेरणा व स्वरुप

# प्रकरण ५ वे

## लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उचल्या' मधील लेखनाची प्रेरणा आणि स्वरुप.

'क्रांतीचे चाक अर्धेच फिरले, आम्हांसह चाक पूर्ण
फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही'[१]

या आपल्या तत्वज्ञानाचा एक भाग म्हणून डॉ. आंबेडकरांनी दलितांना शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मंत्र दिला. १९५६ साली त्याचाच एक भाग म्हणून बौध्द धर्माचा स्वीकार केला व या क्रांतीच्या चाकाला गती आली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गावोगाव शाळा महाविद्यालये निघाली. कामकरी, शेतकरी मुलांप्रमाणेच दलित समाजात एक शैक्षणिक दृष्टीकोन जागा होऊन आपण शिकले पाहिजे. ही जाणीव निर्माण झाली. या भावनेतून दलित मंडळी शाळेत आली कांहीनी व्हरांड्यात बसून, कांहीनी पटांगणात बसून शिक्षण घेतले. कांही वर्षानी वर्गात प्रवेश मिळाला पण 'कोपऱ्यात कोणालाही न शिवता' बसणेच त्यांच्या नशिबी आले. तरी हे ही नसे थोडके या न्यायाने शिक्षणाकडे वाघिणीचे दुध म्हणून दलित मंडळी पाहू लागली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अभ्यासाने एक तेजस्वी अस्मिता जागृत झाली त्यामुळेच आपण माणसे आहोत, माणसाप्रमाणे जगण्याचा आपणास हक्क आहे. आपल्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. लेखणी आपल्या हातात आली पाहिजे हे जाणवले आणि त्यासाठी संघर्षाला सुरुवात झाली. अनेकवेळा त्यात अपयश आले. तरीही आता गप्प बसून चालणार नाही. हे सत्य स्विकारुन संघर्ष सुरु ठेवला. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी तोपर्यंत आपली पावले घट्ट रोवली होती. शासनाच्या कांही सवलती मिळाल्या आणि ही मंडळी मोठमोठ्या नोकऱ्या मिळवू लागली, शिकू लागली या शिकण्यातच आपण कोण, आपणाला गावकुसाच्या बाहेर का रहावे लागते ? सवर्णाच्या पंक्तीत जेवलो म्हणजे काय होते ? माझ्या आईवडिलांना जनावराच्या गोठ्यात जागा का मिळते ? इ. विविध प्रश्नांचा शोध सुरु झाला त्यातूनच वेदना आणि विद्रोहाचा जन्म झाला.

या वेदना शब्दबध्द करण्यासाठी कुणी कथा, कुणी कविता, कुणी कादंबरी कुणी आत्मचरित्र लिहले. अनेक तरुणांना भविष्यकाळाची सुंदर स्वप्ने सत्यात उतरविताना जी वाटचाल करावयाची आहे ती मुकपणाने करणे असह्य होऊ लागले. आणि आत्मकथनाचा जन्म झाला. आपण जीवनात अस्पृश्य म्हणून भोगलेली दु:खे सवर्ण समाजाचा आपल्याकडे पाहण्याचा असणारा 'उपभोग्यवादी वस्तुचा'

दृष्टीकोन याबरोबरच अन्याय, अत्याचार, श्रमाचा नाकारलेला मोबदला माणूस असतानाही कुत्र्याप्रमाणे झालेली हाड-हाड इ. यातना त्यांनी शब्दबध्द केलेल्या आहेत.

याच जाणिवेतून लातूर जिल्ह्यातील धनेगाव येथील उचल्या जमातीत जन्मलेल्या, भूक आणि निवाऱ्यासाठी सर्व कायदेशीर मार्ग बंद झाल्यामुळे चोरी करुन जगणाऱ्या समाजाच्या व्यथा वेदना समाजासमोर आल्या आहेत. हे दारिद्रयाचं, लाचारीचं अपमानस्पद जिणं जगत असताना मार्तंड बाबानं लक्ष्मणला खिसे कापायची भारत पत्ती न देता पाटीन् पेनस दिली तेव्हा लक्ष्या शाळत गेला म्हणून 'पटकी' आली. असा या समाजाचा समज झाला तेव्हा कुलकर्णी गुरुजींनी समजावले 'समद्या गावातील पोरं शाळेत येतात तेव्हा त्याना पटकी का येत नाही' यावर तुळशीराम म्हणतो 'त्यांच्या जातीला लिहाय वाचायचा अधिकार हाय पर आम्हाला त्यो नाही' पुढे मास्तर होईल या आशेने लक्ष्याचे शिक्षण सुरू झाले. अज्ञानीपणामुळे मार्तंडबाला वाटलं की वही घ्यायची ती खराब करता कामा नये. 'पेन लिहिण्यासाठीच ऱ्हातयं' हे न कळल्याने वही खराब का केलीस म्हणून त्याने लक्ष्याला झोडपून काढले. परंतु या शिक्षणामुळेच लक्ष्याच्या मनात विचार येतो 'माझ्या परीस भिकारी चांगला जगतो. बरं, मला देवानं ऐवढा वनवास का दिला'[२] या नंतर लक्ष्या लातूरच्या सूत गिरणीत कामाला येतो. पुढे औरंगाबादलाही जातो. पुन्हा लातुरात येऊन सामाजिक कार्य करतो. त्यावेळी आलेल्या अनुभवाची कहाणी यात वर्णन केलेली आहे.

## 'उचल्या' च्या लेखनामागील प्रेरणा .

१) **समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास.** लेखकाने लेखनाचे प्रयोजन सांगताना सांगितले आहे की, आपण अवती-भोवती या उचल्या लोकांचे दारिद्र, ससेहोलपेट पाहिलेली आहे. हळूहळू कार्यकर्ता म्हणून मी उभा राहिलो तेव्हा जीवन जगत असताना, समाजात रहात असताना प्रत्येकाला गुदमरल्यासारखे वाटते. त्यांच्या व्यथा मी मांडल्या आहेत. माणूस म्हणून जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. उचलेगिरीपासून प्रत्येकाने दूर राहून जगायला शिकले पाहिजे, शिक्षण घेतले पाहिज, अन्यायाच्याविरुध्द संघटीत झाले पाहिजे याचवेळी तथाकथित बुध्दीवाद्यांना व मध्यमवर्गीयांना या समाजाच्या दु:खाची अजिबात कल्पना नाही. म्हणून मी हे लेखन केले आहे.

आपल्या समाजाला भूक आणि निवाऱ्यासाठी असणारे सर्व कायदेशीर रस्ते बंद आहेत त्यामुळे त्यांना चोरी करावी लागते तर दुसरीकडे कोट्यावधी रुपयाची कायदेशीर चोरी

करणारे प्रतिष्टीत, सुशिक्षित. लाच आणि भ्रष्टाचारावर लाखो रुपये मिळवणारी माणसे गुन्हेगार समजले जात नाहीत.

तर पोटासाठी पंधरा - वीस रुपयाची चोरी करणारे गुन्हेगार समजले जातात. आपल्या सर्व भौतिक गरजा पूर्ण झाल्या तरी आरामासाठी बेकायदेशीर मार्गाने लाच खाणारी मंडळी येथे आहेत. जस-जसे लेखक या समाजव्यवस्थेकडे पाहू लागतो तस-तसे शेकडो वर्षापासून या समाजावर अन्याय झाला आहे. त्यांच्या कल्याणासाठी कोणत्याच योजना नाहीत. त्यांचे माणूस म्हणून जगण्याचे हक्कच हिरावून घेतले आहेत. ते एका रात्रीत परत मिळणार नाहीत. हे जरी खरे असले तरी त्यासाठी प्रबोधन, संघर्ष आणि संघटनेची गरज आहे. त्याबरोबरच प्रस्थापित समाजास अंर्तमुख होऊन नव्याने या समाजाबद्दल विचार करण्याची गरज आहे. आपल्या संस्कृतीत निती मूल्याच्या व प्रामाणिकापणा बद्दलच्या संकल्पनेत प्रचंड विरोधाभास आहे. प्रत्येक जातीबद्दल वेगवेगळ्या चौकटी तयार आहेत. अशा वेगवेगळ्या चौकटीमुळे संपूर्ण समाजच ढोंगीपणाने जगत आहे. यात जे उपक्षित आहेत, दरिद्री आहेत, जन्मत: गुन्हेगार आहेत, इच्छा असूनसुध्दा त्यांना माणूस म्हणून जगू दिले जात नाही. तेच भरडले जातात हे सर्व बदलावे या सर्व जीवनाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास व्हावा ही या मागची प्रेरणा आहे.

२) **'वेदना'** : भूक आणि निवाऱ्यासाठी कायदेशीर असणारे सर्व रस्ते बंद झाल्यामुळे चोरी करुन जगणारी ही जमात आहे. पोटासाठी दहा - वीस रुपये चोरणाऱ्याला येथे खडी फोडावी लागते. पण राजरोसपणे लाखो रुपयाचा भ्रष्टाचार करणाऱ्याला प्रतिष्ठा मिळते. ही वेदना येथे व्यक्त झाली आहे. ती व्यक्त करताना ते सांगतात 'आखाड श्रावणात तर रोट्या मिळायच्याच नाहीत मग आम्ही बाबाच्या मळ्यातून रताळ्याचा पाला आणायचा तो शिजवायचा, त्यातलं पाणी काढायचं तो वाटायचा, त्याचे मुटके, कोटबळे करायचे कितीही दिवस त्यावर जगायचं. ज्या रानात रताळं होती तिथला पाला ओरबडून उन्हाळा झाला होता. हा पाला घेतल्यानं बाबाच्या मालकानं शिव्या देऊन आठ दिवस घरी बसविलं, एकतर आम्ही उपाशी मरु लागल्यालं मग बाबाच्या मालकाच्यातलं रताळूचा पाला आम्ही आणताना बाबाला काई म्हणता येईना, बरं बाबानं मालकाला खर सांगितलं की, आमच्या घरी भाजीपाला करुन खायला घेऊन जात्यात तरी बाबाला घरी बसविल, जी पाला जनावरं बी जल्दी खात नाहीत ती पाला आणल्यानं बाबाला आठ दिवस घरी बसावं लागलं. तो पाला बंद झाल्यास लईच

उपाशी मरु लागलो. गावात काम लागाच नाही.'[३] याप्रमाणेच आपला समाज जेव्हा जेव्हा नवा विचार स्वीकारतो, त्या दृष्टीने पाऊले टाकतो तेव्हा त्या समाजाला झिडकारले जाते. आमच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही. या वेदनेचं वर्णन करताना ते सांगतात, 'त्या शाळंत मी नवीन व्हतो. मला हे समदं वेगळं वाटु लागलं. लांडगाच्या कळपांत शेळी शिरल्यागत वाटु लागलं, मला समदे पोरं उचल्याचं लक्ष्या शाळंत आला. म्हून कुनी खडं मारायचं तर कुणी 'लच्छीमन ताता खेकड्याची आमटी खाता का' म्हणून चिडवायचे.'[४] याप्रमाणेच सवर्ण समाजाचा आपल्या समाजाकडे असणाऱ्या उपभोग्यवादी दृष्टीकोनाचे वर्णन केलेले आहे. ते वर्णन करताना त्यांनी चिंगू या त्यांच्या समाजातील स्त्री ची कथा वर्णन केलेली आहे. ती चोरी करण्यात पटाईत होती. एकावेळेला दोन - तीन छटाक सोनं ती आणायची. जाईल तिथं भरपूर खर्च करायची. एकदा तिची कमाई खूप झाल्यानंतर तिने कवठ्याला आईचा गोंधळ ठेवला. बोकड कापून सगळ्यांना जेवणं दिली व स्वत: मोठे चार-पाच गाडगे शिंदी ती प्याली होती. तेव्हा तिच्या अंगात आले, ती नाचू लागली. अचानक चक्कर येऊन खाली पडली. तिचे डोळे पांढरे झाले आणि मरुन पडली. तिच्या मातीला सोलापूरहून बरेच लोक आले होते. तिने किलोच्यावर सोने ज्याला विकले होते तो सोनारपण आला होता. तो सोनार मोठ्यामोठ्याने रडत होता 'चिंगू तू एवढ्या लवकर मरायची नव्हतीस, असं कसं झालं रे देवा' म्हणून ऊर बडवून रडत होता. तो सोनार अत्यंत गरीब होता. चिंगूमुळे तो श्रीमंत झाला. 'तिच्याकडून घ्यायचं सोनं दहा तोळे असेल तर आठ तोळेच सांगायचे परत भाव कमी देऊन नंतर जास्त भावाने विकून त्यानं तीन मजली इमारत बांधली आणि चिंगू मातर जाताना च्यार लेकरं उघडे-नागडे सोडून गेली. त्यांना कसला सहारा राहिला नाही. त्या मुलीचे हाल होत आहेत. चिंगूची इनामदारी पाहून पाचशे रुपयाची साडी त्या सोलापूरच्या सोनाराने आणली पण चिंगूच्या लेकरासाठी कोणी इनामदारी केली नाही. आज ते उपाशी मरत आहेत.'[५] या सवर्ण समाजाच्या वृत्तीप्रवृत्तीप्रमाणेच शासकीय अधिकारी आपल्या समाजाची वेळोवेळी लुबाडणूक करतात, अन्याय करतात विनाकारण त्रास देतात. यासंबंधीची वेदना वर्णन करताना ते सांगतात 'कि असच एकदा लातूरच्या आडतीवरुन तेलाचे डबे आणताना अण्णाला धरलं . पोलिस आण्णाला नागवं करुन गोलाईच्या भवती फिरवू लागले. तेव्हा माराला भिऊन त्यान आमचं घर दावलं. पोलिस आमच्या घरला आण्णाला संग घेऊन आले. समद्याला लायनीत उभ करुन हंटरन मारु लागले. हात फिरल तिकड आमच्या घरातल्या बायका लेकराला मारु लागले. धोंडामायला तर चोरी कसली तीबी माहित नव्हतं. तरीबी केस धरुधरु तिला मारु लागले. धोंडामायच्या थानाला धरुधरु पोलीस इचारत व्हते 'सांग तुझ्या पोरांनी चोरीचा माल कुठ ठेवलाय?' माय रडतच होती. घरात तर कायसुध्दा नव्हतं. तर माय कुठलं काय दावील. मायच्या अंगावरच मंगळसुत्तर

आणि पत्यासुध्दा पोलिसांनी तोडून घेतल्या. घरातलं भांडे कुंडे घेतली समदा माल चोरीचा हाय म्हणून संभादादा, भाऊ समद्याला धरुन नेल. एक पोलीस मायजवळ म्हणला 'दोनशे रुपये घेऊन ये तवा सोडतो' आता आण्णाला, भाऊला, दादाला पोलीस लई मारतील म्हणून मायनं बाजारात समद्या शेळ्या विकून दोनशेची भरती केली. तवा कुठ कोरटात केस न नेता सोडल. आमच्या मायचे सोन्याचे दागिने पोलिसाने हाडपले.

आम्ही तर जातीचे चोर, तक्रार कुणाकड करायची म्हून आम्ही गप्पच राहिलो'.[६]

अशा प्रकार लक्ष्मण गायकवाड आपली वेदना व्यक्त करतात ती वेदना व्यक्त करताना ते अस्वस्थ आहेत. कारण आम्हाला कोणी काम धंदा देत नाहीत म्हणून चोरी करावं लागतं, तर आमच्या सबंध जातीलाच चोर समजता असं का ? आम्हाला चांगल जगू का देत नाहीत ? सावकाराकडून व्याजानं पैसे काढून पोलीसाला पैसे माझ्या मायीला का देवं लागत्यात ? सावकाराचं देणं जास्त होऊ लागल की ते देण्यासाठी माझ्या समद्या भावाला चोऱ्या का कराव्या लागतात ? का याच परिस्थितीत राहिलेल्या म्हनून या नटलेल्या परंपरेचा अभिमान बाळगावा का ? अस मला वाचाया जसं येऊ लागलं तसं मला कळूं लागलं. आन् मराठीच्या पहिल्या पानावरची प्रतिज्ञा वाचली की, ती किती खोटी हाय अस सारखं वाटायचं अन् उदास व्हायचं, नशीबाला दोष द्यायचं. देवाचा धावा करायचा अन् गपचिप वेदना सहन करीत मी उचल्याच्या शाळेत वाढत होतो. अशाप्रकारे 'स्व'बरोबरच 'स्व' समाजाची वेदना शब्दबध्द झाली आहे.

३) **जागृत आत्मभान** : डॉ. आंबेडकरांनी केलेल्या जाणिव जागृतीमुळे, स्वातंत्र्याप्राप्तीनंतर जीवनाच्या सर्व क्षेत्रात दलित भटक्या जाती जमातीतील माणसे येऊ लागली, अनुभव घेऊ लागली, पाहू, वाचू, लिहू लागली. व एक प्रकारचे आत्मभान जागृत झाले. या आत्मभानातून मी कोण ? माझा समाजच असे जीवन का जगतो? मलाच नेहमी का झिडकारले जाते, नाकारले जाते ? याविषयी अध्ययन, मनन, चिंतन सुरु झाले व हे सर्व बदलले पाहिजे. इतराप्रमाणेच आपणाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे ही भावना वाढीला लागली. त्यातून संघर्ष झाला, संघटना निर्माण झाल्या. मोर्चे काढले व आपल्या व्यथा, वेदना वेशीवर टांगल्या. आपले हक्क मिळविण्यासाठी प्रसंगी इतराबरोबर दोन हात करण्याची तयारी त्यांनी ठेवली.

यातूनच नॉनमॅट्रीक असणारा हा मुलगा कामाच्या शोधात लातूरला येतो. व पंधरा ऑगस्टला पहिल्यांदा समोरासमोर पाच दहा वाक्ये तो बोलतो. तेथेच तो संघटनेचा नेता होतो. कामावरुन काढले तरी कोर्टात झगडत राहतो. समाजाची होत असणारी पिळवणूक, भ्रष्टाचार पाहून व्यथीत होतो. पुढे भटक्या विमुक्तांची संघटना बांधतो. वेळोवेळी त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार थांबविण्यासाठी प्रयत्न करतो. भटक्या विमुक्तांना शहाणे करण्याचा प्रयत्न करतो. या समाजाच्या व्यथा शासनाला सांगण्यासाठी मोर्चे, संप इत्यादी मार्गाचा त्यात तो यशस्वी होतो. पुढे खासदारकीच्या निवडणूकीला उभारतो. येथे अपयश आले तरी आपल्या हातून झालेल्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी तो आज धडपडतो आहे. या धडपडण्यातूनच आलेले निरनिराळे अनुभव व समाज सुधारण्यासाठी आपण कोणत्या मार्गाचा अवलंब करावा. याची एक दिशा त्याला मिळाली आहे. 'स्वसमाजा'बरोबरच 'स्व' ची जाणीव होऊन आत्मभान जागृत झाले. उपराकार लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके इ.चे मार्गदर्शन त्यांना मिळाले म्हणूनच हे लेखन झाले आहे.

४. **विद्रोह :-** ''उचल्या'' या आत्मकथनातून ''स्व'' बरोबरच स्व समाजाची जीवन काहाणी वर्णन केलेली आहे. प्रस्थापित समाज वर्षानुवर्ष आपल्या समाजाचा उपभोग घेतो आहे. पोटासाठी दहा वीस रूपयची चोरी करणाऱ्याला मरेपर्यंत गुन्हेगार म्हणून जगावे लागते पण लाखो रूपयाचा भ्रष्टाचार करून लोक मात्र राजरोस पणे मात्र मान सन्मान मिळवतात. विविध शासकीय योजनाचे अधिकारी या योजना स्वत:साठी राबवून धनदांडगे होतात आणि तळागाळातील समाज मात्र आहे त्या स्थितीत जीवन जगतो. आपल्या समाजाला सावकार, पोलिस अधिकारी, सवर्ण वर्णीय, हे सर्वजण भयानक पध्दतीने वागवितात आमच्या मुळेच धनदांडगे होतात या सर्व परिस्थिती विषयी लेखकाने विद्रोहाची भावना व्यक्त केली आहे. कारण हे सर्व थांबल्या शिवाय आपल्या समाजाच्या जीवन पध्दतीत बदल होणार नाही याची त्यानां मनोमन खात्री आहे.

**उचल्यातील प्रेरणाचे स्वरूप :-**

१) **समाजकार्य :-** या लेखन -प्रेरणा स्वरूपाचा विचार करताना आपणाला लेखकाच्या ठिकाणी असणारी समाजभिमुखता लक्षात येते. पाथरूटासारख्या दररोज दोन वेळ हजेरी देणाऱ्या जातीतला हा मुलगा नॉन मॅट्रिक होतो. पंधरा ऑगस्ट दिवशी कामगाराच्या अन्यायाला वाचा फोडतो. तेथेच तो नेता होतो. कामगाराच्या हितासाठी झगडत असताना स्वत:ची नोकरी जाते. पण हाताश न होता

वेगवेगळे व्यवसाय तो करतो हे व्यवसाय तो करत असताना समाजातील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार पाहून व्यथित होतो आणि आपण काही तरी केल पाहिजे म्हणून कामाला लागतो भटक्या जाती जमाती वरील अन्याय ,अत्याचार,खून, बलात्कार होऊ नये या समाजाला रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या गुन्हेगार नसताना होणारा छळ थांबावा म्हणून संप मोर्चे या मार्गाने जाऊन त्याच्या वेदनेला वाचा फोडण्याचा प्रयत्न करतो. त्याची संघटना स्थापन करतो.

अशा प्रकारे आपल्या जीवनातील जास्तीत जास्त वेळ व पैंसा तो समाज कार्यात घालवितो. शिक्षण संस्था स्थापन करून या समाजाच्या अज्ञान, दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न करतो. पुढे जायकवाडी प्रकल्पात गुत्तेदार म्हणून काम करताना स्वत:च स्वीकारलेल्या लाचारीची, भ्रष्टाचारी मार्गाची त्याना लाज वाटते. म्हणून हा व्यवसाय बंद करून राजकारणाात सहभा घेऊन समाज सुधारक घडवू पाहतो पण तेथे प्रचंड निराशा आणि प्रचंड आश्वसने त्याची पदरी पडतात. असे असले तरी तो समाज सेवा करीतच राहतो इतर समाजाप्रमागेच आपल्या समाजाने शिक्षण ध्यावे. चोरी करू नये, इतर नागरी समुदाया प्रमाणे स्थिर व मान सन्मानाचे जीवन जगावे याप्रमाणेच इंग्रजानी मारलेला गुन्हेगार जमातीचा शिक्का पुसला जावा हीच या लेखकाची प्रमाणिक भुमिका आहे. वेळोवेळी या प्रयत्नात अपयश आले तरी लेखकाची दृष्टी समाजिक जाणिवेने भारलेली आहे.

''उचल्या'' तील प्रेरणा स्वरुपाचा अभ्यास करीत असताना लेखकाच्या ठिकाणी असणारी समाजशीलता या पध्दतीने वेळोवेळी व्यक्त होते. आपल्या समाजाच्या विकासासाठी, संघटनेसाठी लेखक अहोरात्र झटतो आहे. त्याच्यातला सच्चा कार्यकर्ता जागा आहे पण त्याचा राजकीय बळी घेतला गेला आहे हे ही एक सत्य आपल्या लक्षात येते.

२. **अनिष्ठ रुढी आणि परंपरा :** आपला समाज शिक्षणापासून दूर आहे. तो स्थिर जीवन जगू शकत नाही. औद्योगिकीकरणाच्या, विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होत नाही. परिणामी तो दरिद्री आणि दरिद्रीच राहतो. आपला समाज शिक्षणाकडे विकृत दृष्टीकोनातून पाहतो. शिक्षण ही उच्च वर्णीयाची मिरासदारी आहे हा समज या समाजाने करुन घेतला आहे. खरे तर शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते दूध पिण्याने एक दृष्टी येते हे आपला समाज विसरतो याचे दु:ख त्यांना आहे. म्हणून त्यांना वाईट वाटते व इतर समाजही आम्हाला या प्रक्रियेत सहभागी होऊ देत नाही. याचे दु:ख वर्णन करताना त्यांनी आपल्या

लहानपणीचा शाळेला गेल्यानंतरचा एक प्रसंग वर्णन केलेला आहे. ते म्हणतात ''त्या शाळंत मी नवीन जात होतो मला समदं येगळं वाटू लागल. लांडग्याच्या कळपात शेळी शिरल्यागत, मला समदे पोरं उचल्या लक्ष्या शाळंत आला म्हनू कुणी खडं मारयचं तर कुणी '' लच्छीमन ताता खेकड्याची आमटी खाता'' का म्हनू चिडवायचे मी त्या शाळेत जाऊन यायचा तीन चार दिवस झाल्ते की, आमच्या शेजारी माझ्या भावकीतल्या शेशीला, तुक्याला, पंचफुलीला आमच्या आळीतल्या समद्या बारक्या लेकराला हगवण अन् उलट्या सुरु झाल्या. आमचे शेजारचे तुळशीराम, पांडुरंग, संभा यांनी बाबाला बलावून घेतलं अन् बाबाला, मायला तुळशीराम, पांडुरंग भांडू लागले तुझ्या लक्ष्याला शाळत घातलंस म्हनून आमच्या लेकराला हगवक, उलट्या सुरु झाल्या. आपल्या आळीत कदीच पटकी आली नव्हती. आजपातुर कसलीच रोगराई नव्हती बरं, मारतंडा तुझं हे कडू पोरगं शाळत गेल्यापासून हा रोग आपल्यात आलाय बघ. अन् आपण काय वान्या, बामनाचं नाहीत, पोराला शाळत घालायला. आपल्या संता मुच्चरदी कदी कुणी शाळा शिकलयं का ?''[७] या भयानक विचारप्रणालीप्रमाणेच लेखकाने आपल्या समाजातील भयानक रुढी परंपरेचे, जात पंचायतीच्या भयावह स्वरुपाचे वर्णन केलेले आहे. हे वर्णन करताना ते म्हणतात ''एकदा सलगऱ्यात शंकऱ्या म्हून व्हता. त्यानं आपल्या पोरीला बायकू म्हून वापरला मग ही लई मोठी पंचायत झाली. एकदा सलगऱ्यात बसली, एकदा धनेगावात बसली पुन्हा भाडगावला बसली तर निरनय काई तळंगे लोकांना देताच येईना झाला. केस लई मोठी हाय म्हनून तंटा लईच आटपना झाला की आमच शेवटचं मोठ पंचायत कवठा इथ रहायचं. तिथं मास्तरकाका म्हणून व्हते ते आमच्या जातीतले पहिले शिक्षक होते ते सोडवायचे. इथं पंचायत बसली की, इथला निर्णय मान्य करावा लागायचा अखेर कवठ्यामध्ये पंधरा दिवस तंटा चालला जात पंचायतीच्या लोकांनी ठरवले, शंकऱ्यानं आपल्या पोरीला बायकू म्हनून वापरला अन आपल्या जातीचं लई वाटूळ केला. म्हनून आमच्या जात पंचायतनं दोन वर्ष शंकऱ्या अन् त्याच्या पोरीला वाळीत टाकलं अन् शंकऱ्याच्या मिशा त्याच्या पोरीच्या मूतात भादराव्यात अशी शिक्षा दिली.[८] अशा या भयानक वास्तवाबरोबरच लेखकाने आपल्या समाजातील असणारे जातपंचायतीचे वर्चस्वही वर्णन केलेले आहेत. हे वर्णन करताना त्यांनी सलगरे गावातील लग्नातला प्रसंग सांगितला आहे. सलगरे गावी लग्नाला गेले असताना नवरीच्या आईने एका मराठ्याशी घरोबा केल्याचा प्रश्न उपस्थित झाला. जात पंचायत बसली ''पंच लोक बोलाया सुरु झाले. कुणी म्हणायचे बाईला गू खायला लावा, कुणी म्हणायचे दोन हजार रुपये दंड करा, कुणी म्हणायचे नाक कापा. शेवटी एकानं मदला मार्ग काढला, की नवरीच्या आईचे समदे केस भादरुन कापून लावा. यावर सर्व पंचाचं एकमत झालं अन् त्या बाईचे केस कापायचं ठरलं. माझ्या डोसक्याला मुंग्याच आल्या. मला वाटू लालं

आपला समाज किती मागासलेला आहे. किती आगोरी प्रकार आपन बगतोय. एकीकड सुधारलेला शहरी समाज आन् एकीकडे आमची जातपंचायतीचा दंश भयानक किळसवाणा वाटायचा. बरं मी तर काय समाजापुढ छोटा''.[१]

अशा प्रकारे आपल्या समाजातील अंधश्रध्दा रुढी परंपरा समाजजीवनाची विचारप्रणाली लेखकाने वर्णन केलेली आहे. त्यासाठी ते अस्वस्थ आहेत, उदास आहेत हे सर्व थांबले पाहिजे. अशी त्यांची धारणा आहे. त्यासाठी ते प्रयत्नशील आहेत पण त्यांचा प्रयत्न सेतूबंधनात खारीसारखा आहे. अर्थात तो महत्वाचा आहे हे मान्य करावे लागते.

३) **दयनीय स्त्री जीवन :-** दलितांना प्रस्थापित समाजरचनेने क्षुद्र लेखून त्यांच्यावर अत्याचार केले परंतु ''स्त्रीला'' सुध्दा त्यापेक्षा वेगळी वागणुक दिली नाही. मग ती स्त्री सवर्णातील असो कि दलितातील असो . दलित आत्मकथनातून येणाारी स्त्री ही सतत राबणारी आपल्या मुलाबाळासाठी, फुटक्या तुटक्या संसारासाठी, नवऱ्यासाठी राबणारी, त्याची चिंता करणारी सोसिक मनाची स्त्री आहे. ही स्त्री पुरूषाच्या बरोबरीने, कधी त्याच्याहून जास्त श्रम करून त्याला हिमतीने उभे करणारी स्त्री आहे. घरातील कर्ता पुरूष व्यसनी, आळशी, वेंधळा असेल तर तिच पुढाकार घेऊन संसाराचा गाढा रेटते.

''उचल्या'' तून दिसणारी स्त्री अशीच आहे. नवरा चोरी करीत गावोगाव हिंडतो पण पोलिसाचा मार ती खाते. कुटुंबाचा भार सोसते लेखकाची आई धोंडामाय अशीच आडाणी ,अशिक्षित आहे परंतु दुधदुपत्याचा व्यवसाय करते. वेळोवेळो पोलिसाचा मार खाते . पोलिसाच्या तावडीतून लेकरांना सोडावण्यासाठी लोकांच्या हातापाया पडून कर्ज काढून त्यांना सोडविते. ती कष्टाळू व धाडसी आहे. लेखकाची भावजय देखील कुटुंबासाठी जाते उपटण्याचे काम करते पण या सर्व स्त्रिया रूढी आणि प्रंपरेची शिकार बनलेल्या आहेत. वेळोवेळी चोरीच्या गुन्हयाखाली तिला पोलिस स्टेशन मध्ये जावे लागते पतीच्या संशय खोर वृत्तीमुळे प्रसंगी तिला प्राण दयावा लागतो. या भयानक वास्तवाचे वर्णन करताना लेखकाने त्याच्या आईचा एक प्रसंग वर्णन केलेला आहे. ते म्हणतात '' माझा बाबा चामल्याच्यात जेवत व्हता. जेवता म्हणजे पोटावरची नोकरी म्हनून बाबा घरी जास्त यायचा नाही . एकदा रात्री दिवस मावळता घरी आला त्याला माहित झाल्तं की मायनं, तातानं, अन मी उंदीर माजंर खाल्लं. बाबानं डोळे लाल बुंद केला व्हता. आमचा बाबा घरी यायाचा म्हणजे कोनाला तरी मरूस्तर माराया. मी बाबा आला म्हनून हागणदारीत जाऊन लपून बसलो. बाबानं माझं नांव घेतलं नाही.

मला वाटलं आपल्याला मार न्हाई. हळूच घराकडं आलो, बाबानं मायला घरात कोंडून उठाबशा काढायला लावल्या. मग मारीत बाहेर आणला तेवढयात ताता आला'' का मारतूस माझी एकटी पोर हाय'' म्हणला तवा बाबानं गवत कापायाचा इळा हिबालून ताताला मारलां . तवा माय आडवी झाली. इला ताताला लागायाचा तर मायच्या डोक्सात लागला. माय आडवी पडली रगत भळभळ निघू लागलं . तवा पांडूरंग, संभा,तुळशीराम यांनी सोडवलं मायला उठवून दादानं आन्तानं डोक्सात हळद भरून चिरगुटात बांधलं''१०

अशाप्रकारे लेखकाने आपल्या समाजातील स्त्रीची दयनीय अवस्था वर्णन करताना सांगितले आहे की, आमच्यात बायकोला कधीबी सोडता येते अन् नवऱ्याला दुसरी बायको करुन घेता येते. जात पंचायतीमध्ये नवऱ्याला अगर बायकोला नको असल्यास लग्नाचा खर्च भरुन द्यावा लागतो. जेवढा खर्च नवरा सांगतो किंवा बायकोचा बाप सांगतो तेवढा भरावा लागतो. अश्याप्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मनुष्य आकाशात पक्षाप्रमाणे विहार करायला लागला, पाण्यात माश्याप्रमाणे पोहायला शिकल. पण मनुष्य मनुष्य होवू शकला नाही असे म्हटले जाते. ते ही सर्व कहाणी ऐकल्यानंतर खरे वाटते कारण याच संस्कृतीत

''यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमणीते तत्र देवता''

असे ज्या स्त्रीच्या बाबतीत म्हटले जाते त्याच स्त्रीचा आज रुढी परंपरेने बळी घेतला आहे. भयानक अशा बंधनात ती जखडून गेलेली आहे. धन प्राप्त करण्यासाठी तिला बळी दिले जात आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांवर वेळोवेळी बलात्कार होतो आहे. म्हणजेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपण काय मिळावले याचा आता नव्याने हिशोब करण्याची गरज निर्माण झाली आहे. यानंतर लेखकाने अश्याच एका भयानक प्रसंगाचे वर्णन केलेले आहे. ते सलगरी गावी लग्नाला गेल्यानतंर नवरीच्या आईने एका मराठ्याशी घरोबा केल्याचा तंटा उभा राहिला. जात पंचायत बसली. भांडण जुंपले. ''कुणी म्हणायचे गु खायला लावा, कुणी म्हणायचे दोन हजार रुपये दंड करा, कुणी म्हणायचे नाक कापा. शेवटी एकान मदला मार्ग काढला की, त्या नवरीच्या आईचे समदी केस भादरुन कापून लावा. यावर सर्व पंचाच एकमत झांल आनं त्या बाईचं केस कापयंच ठरलं माझ्या डोसक्याला मुंग्याच आल्या माला वाटू लागले आपला समाज किती मागासलेला आहे. किती आगोरी प्रकार आपण बघतोय''. यानंतर त्या स्त्रीची त्या जात पंचायतीने केलेली विटंबना सांगताना ते म्हणतात ''पोटच्या गोळ्याचं

लगीन राहील अनं एकदा लगीन मोडलं तर पोरगी तशीच राहील तिला कुणी घ्याचयचं नाही म्हनून भीतीनं नौरीची माय जात पंचायतीच्या लोकांमध्ये बसली सर्वांच्या पाया पडली नौरा मेल्यागत बघत बसली. अखेर एका पंचानं वस्तरा आनला आनं पाण्यात भिजवून डोक्यावरला केस काढाया सुरुवात केली. त्या बाईचं काळीज तीळ तीळ तुटत होतं''.[११]

अश्याप्रकारे दलित समाजातील स्त्री जीवन भयानक अशा रुढी परंपरेच्या चक्रात सापडलेली आहे. व भयानक जीवने ती जगत आहे. दैन्य, दारिद्र्य, दास्य, व्यथा वेदना भोगूनही ती कष्ट करते आहे. आपल्या कुटुंबाच्या विकासासाठी अहोरात्र राबाते आहे.

४) **भाषिक वेगळेपण** : तळागाळातील प्रत्येक समाजाने आपले वेगळे वैशिष्ट निर्माण केलेले आहे. त्यातून इतर समाजापासून दूर राहणे, हीच त्यांची भूमीका आहे. उचल्यामधील जीवन ही असेच परंपरेने इतर समाजापासून वेगळे असल्याचे दिसते. या वेगळया वैशिष्टया मध्ये त्यांचे भाषिक वेगळेपणे एक महत्वाचे वैशिष्टये आहे. भाषा ही समाजाची फार मोठी संपत्ती आहे. या भाषेच्या माध्यमातून त्या आपला जीवन व्यवहार करतात. उदा: पोलिसाच्या खबऱ्यासाठी ''गुरंदा'' हा शब्द वापरतात पोलिसासाठी '' कुकळीनी '' हा शब्द वापरतात. बोलता बोलता फसविण्याच्या पध्दतीला ''उठेवारी'' हा शब्द वापरतात. घबाड मिळविणे या साठी ''मूडप'' हा शब्द वापरतात. चोरी करायला जाऊ हे सांगण्यासाठी ''तिरगाया'' हा शब्द वापरतात आठवडे बाजारातील चोरीसाठी ''संतामुच्चलर'' हा शब्द तर पोलिसाला लाच देणे यासाठी ''काकुल कुसुल'' हा शब्द वापरतात .गठुडे चोरण्यासाठी ''मुट्टल त्यचींग'' हा शब्द वापरतात. डुक्करासाठी ''गुन्ना'' हा शब्द वापरतात .

असे भाषिक वेगळेपण या समाजाने जपले आहे.

( यल्लम्मा, मरीआई, तुळजाभवानी देवीची पूजा हा समाज करतो. यात्रेजत्रेत ज्या ब्लेडने खिशे कापायचे आहेत. त्या ब्लेडची पूजा करुन तिच्यासमोर कोंबडे कापतात. वेळप्रसंगी किर्तनकार, प्रवचनकाराचा वेश धारण करतात. असे बहुरंगी आणि बहुढंगी जीवन या समाजाचे असल्याचे अपणाला दिसते. )

'उचल्या' या आत्मकथनामागील प्रेरणा स्वरुपाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, या लेखनात आपल्या व्यथा वेदना लेखकाने केंद्र स्थानी ठेवलेलीआहे. त्यातून लेखकांच्या ठिकाणी

असणारी समाजिक जाणिव दिसून येते. लेखक आपल्या समाज जीवन प्रणाली बरोबरच कुटुंबाची अस्ताव्यस्तता सांगतो. व त्यासाठी तो व्यथित होताना दिसतो. परंपरेने या समाजाला गुन्हेगार म्हणून जो शिक्का मारला आहे. तो आता पुसला जावा ही त्याची प्रमाणिक तळमळ आहे. कुठेही गुन्हा घडला पोलिस सरळ या समाजाची धरपकड करतात. याबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. हा संताप व्यक्त करताना हे म्हणतात 'जर एखाद्या जनावराला चारा नाही टाकला, अनं त्येला वैरणकाडी नाही केली जर जनावर लई आरडतात मग रातच्याला जनावरं भुकेच्यापोटी भुक सहन होईना झाली की, आपल्या दावणीतल्या दाव्याला झटके दिवून, दिवून मेकचं बांधलेल दावं तोडतात अनं तिथ शेतात खान्यासारखं पीक असेल तिथ जावून पिकावर चरुन चरुन पोट भरले की, घरी येतात''.[१२] अशाप्रकारे लेखकाने आपल्या समाजाची बाजू, व्यथा वेदना माडण्याचा प्रयत्न केला आहे. हे मांडत असताना. सामाजिक जाणीवेची पार्श्वभूमी येथे प्रधान आहे. लेखक या ठिकाणी आपल्या भावनु भावचा शोध सामाजिक पातळीवर घेतो आणि त्याची साहित्यकृतीतून अभिव्यक्त करतो. या सामाजिक जाणिवेचा संबंध वास्तवाशी आणि जीवनाशी असतो म्हणून यशवंत मनोहर लिहतात 'वांङमनीय कला कृती भोवतीच्या सांस्कृतिक, आर्थिक, वाङमयीन नैतिक आणि सामाजिक संदर्भातूनच साकार होत असते. या सर्वांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम वाङमयीनकृतीत मुखरीत होत असतो. साहित्य हे समाज जीवनाचे महत्त्वाचे अंग असून इतर अंगाशी त्याचे अंग भूत नाते असते. साहित्याचे विश्व हे त्यामुळेच सांस्कृतिक विश्व ठरते. कांहीही केले तरी साहित्य कृतीला जीवनापासून तोडता येत नाही''. [१३]

या अर्थाने 'उचल्या' या आत्मकथनातून व्यक्त होताना दिसतात. या सर्व व्यथनांचा समाज शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास व्हावा. आपला समाज शिक्षणाच्या प्रवाहात यावा. इंग्रजांनी मारलेला गुन्हेगारीचा शिक्का आता पुसला जावा. सवर्ण समाज सर्वत्र विखुरलेल्या शक्तिने, संख्येने कमी असणाऱ्या जातीवर जे अन्याय आणि अत्याचार, बलात्कार करतो आहे. ते थांबले पाहिजे. त्यांनीच आता आपला दृष्टिकोन बदलाला पाहिजे. तळागाळातील या समाजाने शिक्षण घेतले पाहिजे. ही या लेखनामागची प्रामणिक तळमळ आहे.

'उचल्या' या लेखनाचा अभ्यास केल्यानंतर या लेखनाच्या कांही मर्यादा ही आपल्या लक्षात येतात. त्याम्हणजे या लेखनाची लेखनरीती विस्कळीत स्वरुपाची आहे. कारण जीवनातील विविध घटना अभ्यासताना असंबध्द कथानकाचा सांगाडा तयार झाल्याचे आपणाला दिसते. अर्थात या लेखनामागील तळमळ, वेदना, व्यथा, राजकीय वाटचाल ही प्रामाणिकपणाची ग्वाही देणारीच आहे. वस्त्राआड दुनिया नागवी आहे हे एक सत्य आहे. पण ते वस्त्र काढून नागवेपण दाखविण्यात एक प्रकारची असभ्यता दिसून येते. असे असले तरी समाज प्रवाहापासून युगानुयुगे दूर असणाऱ्या दारिद्र्य, दैन्य, दास्य, अधांरात राहणाऱ्या या समाजाचे जीवन '**उचल्या**' या आत्मकथनामुळेच समाजासमोर आले. ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे.

# संदर्भ टिपा


१) दलित आत्मकथन - नलगे, पांनतावणे संदेश पान, सुरेश एजन्सी २०५ शुक्रवार पेठ, पुणे प्र. आ.१९८६ पृ. २२१

२) उचल्या - लक्ष्मण गायकवाड २५० शनिवार पेठ, पुणे प्र.आ. १९८७, पृ. १४

३) उनि - पृ. ३१.

४) उनि - पृ. १३.

५) उनि - पृ. १४७.

६) उनि - पृ. १४९.

७) उनि - पृ. १४.

८) उनि - पृ. ४२.

९) उनि - पृ. ९८.

१०) उनि - पृ. १८.

११) उनि - पृ. ९९.

१२) उनि - पृ. ५.

१३) बांधिलकी आणि साहित्य - यशवंत मनोहर सिल्व्हिया प्रकाशन, नागपूर प्र. आ. १९८३ पृ. १७